# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

३ रा मजला, सिडको भवन
(दक्षिण कक्ष), बेलापूर
नवी मुंबई ४०० ६१४.

दूरध्वनी : ७५७ १६ ७७
७५७ १६ ७३
७५७ ०३ ७०
७५७ ०१ ६६
फॅक्स : ७५७ ०९ ६९.

**वित्तिय जबाबदा-या असणारे**
**प्रस्तावांना मंजूरी प्राधिकार**

क्र. मजीप्रा / सस / तांशा १ / 2623

दिनांक :-१२-९-२००१.
20/9/01

**परिपत्रक क्र.** ७४.

संदर्भ :- १] प्राधिकरणाचे इंग्रजी परिपत्रक क्र. MWSSB /FA-III/ Excess Quantity/ ७६५/९३ dtd.१३-८-९३.
२] तांत्रिक परिपत्रक क्र.२७ दि.३-९-१९९९.
३] परिपत्रक क्र. मजीप्रा / सस / तांशा १ / ४११७ दि.१९-१२-९८.

संदर्भिय परिपत्रक क्र.१ अनुसार कामाच्या परिमाणात झालेल्या वाढीमुळे [करारातील कलम ३८ अन्वये देय] रुपये ५ लाखापेक्षा जादा रकमेचे मंजूरीचे प्रस्ताव व संदर्भिय परिपत्रक क्र.२ अनुसार अतिरिक्त बाबींवरील खर्च करण्यापूर्वी त्या कामावर मंजूर केलेल्या सर्व अतिरिक्त बाबींची किंमत विचारात घेऊन एकूण अतिरिक्त बाबींचा खर्च मंजूर योजनेच्या १०% किंवा १ कोटीपेक्षा जास्त नाही या मर्यादेपर्यंत मंजूरीचे प्राधिकार तसेच निविदा स्वीकृतीबाबतही क्र.३ येथील संदर्भित परिपत्रकातील परिच्छेद ३[४] प्रमाणे विशिष्ट मर्यादेपर्यंत निविदा स्वीकृतीचे प्राधिकार मध्यवर्ती कार्यालयातील तांत्रिक शाखेस आहेत अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

उपरोक्त मंजूरी प्राधिकाराची अंमलबजावणी करण्यापूर्वी सदर बाबींचा प्रस्ताव, त्यानुसार त्या प्रमाणांत प्राधिकरणावर वित्तिय भार येत असल्याने, वित्तीय मंजूरीसाठी सदस्य सचिव यांच्याकडे पाठविणे आवश्यक राहील. अशी मंजूरी प्राप्त झाल्यावरच प्रत्यक्ष निधी उपलब्ध आहे किंवा नाही, मंजूर अनुदानापेक्षा खर्च जास्त होतो आहे किंवा कसे हया बाबी वित्तीय नियंत्रणाच्या दृष्टीकोनातून निधी वितरणाच्या वेळीही पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे कोणतीही आर्थिक जबाबदारी स्विकारताना दक्षता बाळगणे व योग्य वित्तीय नियोजन आवश्यक असल्याने, उपरोक्त तीनही परिपत्रकातील संदर्भित अशी सर्व प्रकरणे [मध्यवर्ती कार्यालयाची मंजूरी आवश्यक असलेली ] अंतीम मंजूरीसाठी निम्नस्वाक्षरीताकडे सादर करणेत यावीत. तशा मंजूरीनंतरच पुढील कार्यवाही करावी अशा सूचना याद्वारे निर्गमित करण्यात येत आहेत.

17/09.

[ **सुरेश साळवी** ]
सदस्य सचिव

प्रत :- सदस्य सचिव [तांत्रिक], महा.जीवन प्राधिकरण, मुंबई ४०० ०२१.
प्रत :- वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, सिडको भवन, नवी मुंबई.
प्रत :- सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
प्रत :-सर्व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
प्रत :- सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग,